# प्रकरण - दुसरे

## हायकूतील आशय सौंदर्य

# प्रकरण - २ रे

## विषय : आशय सौंदर्य

### आशय सौंदर्य

जपानमधे हायकू हा काव्यप्रकार जन्मास आला. त्याचे रचनात्मक तंत्र विशिष्ठ प्रकारचे असले तरी महत्व आहे ते त्यातील आशय सौंदर्याला. हायकू काव्यरचना करणाऱ्याला कवीच्या ठायी एक विशिष्ट प्रकारची ' वृत्ती ' असावी लागते. गझलच्या संदर्भात पु. ल. देशपांडे यांनी म्हटले आहे, '' गझल हे एक वृत्त असले तरी ती एक वृत्ती आहे ''[१] हे विधान हायकूच्या संदर्भात महत्वाचे आहे, म्हणून शिरीष पै यांनी या संदर्भात केलेले विधान त्यादृष्टीने अर्थपूर्ण आहे. त्यांनी म्हटले आहे, '' जपानी हायकूच्या अर्थाचाच मराठीत अनुवाद करावा लागेल ........'' हायकू रचनेत हायकू वृत्तीला महत्व आहे ''[२] या सर्व विधानांचा अर्थ असा की परकिय भाषेतून येणाऱ्या कोणत्याही वाङमय प्रकारातील रचना तंत्राला महत्व देण्यापेक्षा आशयाला आणि आशय अभिव्यक्त करणाऱ्या पध्दतीला महत्व द्यावे लागते. म्हणून हायकूच्या आशयाच्या वैशिष्ट्यांचा विचार करणे उचित ठरेल.

### निसर्गचित्रणाला प्राधान्य :

हायकू या काव्यप्रकारात महत्वाचा भाग म्हणजे निसर्ग चित्रण, जपानी लोक अत्यंत निसर्गप्रेमी आहेत. वृक्षवेली, ऋतू यांचे त्यांच्या जीवनात म्हूणन संस्कृतीमध्ये महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे हायकू रचनेत निसर्गचित्रणाला अत्यंत महत्व प्राप्त होते. अर्थात हे निसर्गचित्रण मराठीतील निसर्ग चित्रणापेक्षा वेगळे आहे. म्हणून शिरीष पै यांनी म्हटले आहे, '' जपानी काव्याच्या संकेताप्रमाणे निसर्गातील घटनेशी जेव्हा हायकू संबंधीत असतो त्यावेळी तो त्याच्या अस्सल स्वरुपात भेटतो. निसर्गातले एखादे दृश्य किंवा निसर्गात अकस्मात घडलेली एखादी नाट्यपूर्ण घटना कवी बघतो आणि अचानक त्या दृश्याशी किंवा

घटनेशी त्याच्या अंतर्मनाची तार जुळून जाते. जागृत जाणीवेच्या त्या विशिष्ठ क्षणाची नोंद कवी हायकू मध्ये करतो.''[३]

उदा. - एक कोकिळा साद घालते·
बांबूचं बन
चंद्रकिरणांनी उजळते.

(बाशो - भाषांतर हायकू, पृ. ५)

पुढे त्यांनी म्हटले आहे, '' निसर्गातील घटनेतून कवीला जाणवलेले अनुभवाच्या अस्सलपणावर हायकूचे यश अवलंबून आहे, ''[४]

उदा. - एक तळं ...... जुनाट ..... स्तब्ध
एक बेडूक बुडी घेतो त्यांत
जराशी खळबळ आणि पुन्हा शांत

या विवेचनातून असे दिसून येते की, हायकूमध्ये निसर्गातील वास्तव घटनेला महत्व असते. निसर्गामध्ये ज्या विविध घटना घडतात अशा घटनांचे चित्रण हायकू - कवी करीत असतो. त्यामुळे हायकूमध्ये साहित्यातील वास्तवता हे एक मूल्य महत्वाचे ठरते. निसर्गामध्ये जशा घटना घडतात त्याचे जसेच्या तसे चित्रण हायकूमध्ये अपेक्षित असते.

उदा. - पांढरे शुभ्र फूल चाफ्याचे
बघताक्षणीच मी खिडकीबाहेर
का गळून पडावे जमिनीवर ?

(हायकूचे दिवस पृ. ३०)

उधळत गेला वारा

धुळीला, पाचोळ्याला

आणि फुलपाखरांला !

(हायकूचे दिवस पृ. ३१)

इतक्या वेगानं गाडी पुढं गेली

रस्त्यावर उमललेली रानफुलं

डोळे भरुन पहाताही नाही आली

(धृवा पृष्ठ १७)

केव्हापासून करतोय कावकाव [redacted]व

खिडकीवरला एकाकी कावळा

इतका भरुन येतो त्याचाही गळा ?

(धृवा पृष्ठ ३०)

उडत उडत फुलपाखरु

उंच उंच गेलं

आकाशात कुठं हरवलं ?

(हायकू पृ. २८)

एक पान गळून पडतंय

अरेरे .... अरेरे .... आणखी एक

गळून पडलंय आणखीन एक

(- रॅनसेत्सू)

अशा फुलपाखराला
काटेरी झुडपावर
जन्म मिळावा ?

(हायकूचे दिवस पृ. ४१)

ज्याने मला इतका आनंद दिला
तो चेरीचा बहर आता
पृथ्वीवरुन अदृश्य झाला.

- इस्सा
(हायकूचे दिवस पृ. ४३)

जपानी हायकूमध्ये निसर्गाला महत्व असते. त्या प्रदेशातील निसर्गाची अनेक चित्रे जपानी हायकूमध्ये प्रतिबिंबीत झाली आहेत. जपानमध्ये चेरी,मेपल सारखे वृक्ष वेल .........फुले ...........ऋतु यांची वर्णने आढळतात ही वर्णने जपानी प्रदेश व संस्कृती यांच्याशी. निगडीत असल्याने त्यांचे संदर्भ आपणास आकलन होत नाहीत. पण सूर्य, सूर्यप्रकाश, चंद्र, चंद्रप्रकाश, सकाळ, दुपार, संध्याकाळ वर्षाऋतू, शरद ऋतू , वसंत ऋतू, ग्रीष्म ऋतू, नदी, सागर यांचे संदर्भ सर्व परिचित असल्याने ते हायकूत आपल्याला भावीत होतात. शिरीष पै, सुरेश माथुरे, शांता शेळके यांनी भारतीय संस्कृतीच्या संदर्भात निसर्गाच्या विविध दृश्यांचे चित्रण केले आहे. त्यामुळे त्यांचे हायकू आपल्याला चटकन भावीत होतात.

हायकूमध्ये निसर्गात घडणाऱ्या घटनेचे चित्रण असले तरी ते चित्रण रुपकात्मक प्रतिकात्मक स्वरुपाचे नसते. हा हायकू काव्यप्रकाराचा एक महत्वाचा विशेष होय. मराठी काव्यात निसर्गकविता भरपूर प्रमाणात लिहिली गेली. पण ती कविता लिहिताना

निसर्गातल्या वास्तव घटनेचा उपयोग मराठी कवींनी मानवी जीवनातील कोणत्यातरी भावनेसाठी त्याचा उपयोग करुन घेतला आहे. उपमा, उत्प्रेक्षा, रुपक या सारखे अलंकार म्हणून निसर्गाचा वापर केला. तर काहीवेळा मानवी जीवनातील विविध भावभावनेचे चित्रण करण्यासाठी निसर्गाचा पार्श्वभूमीसाठी वापर केला. तेथे केवळ निसर्गाला महत्व नव्हते. त्याठिकाणी निसर्ग हे भावनेचे साधन होते. परंतु हायकू मध्ये निसर्ग हा केवळ ' साधनरुप ' असून तो ' ' वस्तूरुप ' आहे. हायकूमध्ये कवी निसर्गालाच प्राधान्य देऊन केवळ निसर्गाचेच जसेच्या तसे चित्रण करतो. दुसऱ्या शब्दात हायकू काव्यप्रकाराची प्रेरणा ' निसर्गातील घटना हीच असते '' हे हायकू या काव्यरचनेत महत्वाचे वैशिष्ट्य आहे. म्हणून शिरीष पै यांनी म्हटलेले आहे की, '' एखाद्या चित्रात जे सामर्थ्य असते ते तेच बऱ्याच अंशी हायकूत असू शकते. एखादे सुंदरसे चित्र विशेषत: एखादाच मोजका रंग वापरुन अगदी मोजक्याच रेषामधून उभे केलेले एखादे जुन्या शैलीतले चिनी चित्र पाहाताच आपण एकाएकी स्तब्ध होतो. हृदयात प्रशंसा दाटून आल्याने आपला श्वास जणू एकाकी बनतो. ''[१] पाश्चात्य निसर्गवादी साहित्यात बाह्यजीवनातील निसर्गाचे वास्तववादी जसे आहे तसे - असे चित्रण केले असते. त्याचाच हा एक जपानी प्रकार आहे. मग प्रश्न असा उपस्थित होईल की, केवळ निसर्गाचे चित्रण असेल तर या काव्यप्रकाराला एवढे महत्व का द्यावे ? त्याचे कारण हायकू हा केवळ निसर्गाचे चित्रण करत नाही तर निसर्ग चित्रणातून तो आणखी काही अनुभव व्यक्त करु इच्छितो आणि त्या अनुभवाला अर्थाचे अनेक पर्याय असल्याने निसर्ग चित्रणाला एक फार मोठी गूढता प्रतीकात्मकता प्राप्त होते. शिरीष पै यांनी म्हटले आहे, '' प्रत्येक हायकू निसर्गातील घटनेशी संबंधित असायलाच हवा असा नाही, तथापि जपानी काव्याच्या संकेताप्रमाणे निसर्गातील घटनेशी जेव्हा हायकू संबंधित असतो त्यावेळी तो त्याच्या अस्सल स्वरुपात आपल्याला भेटतो. निसर्गातले एखादे दृश्य किंवा निसर्गात अकस्मात घडलेली एखादी नाट्यपूर्ण घटना कवी बघतो, आणि अचानक त्या दृश्याशी किंवा घटनेशी त्याच्या अंतर्मनाची तार जुळून

जाते. जागृत जाणिवेच्या त्या विशिष्ठ क्षणांची कवी त्या हायकूमध्ये अभिव्यक्ती करतो.''[६] याचा अर्थ निसर्ग चित्रणहाच हायकूचा एक महत्वाचा विशेष आहे. त्यामुळे इतर विषयांवरील 'हायकू सद्‌श्य रचना' 'शुध्द हायकू' बनत नाही. हायकू मधुन वाचकाला पहिला येणारा प्रत्यय हा निसर्गातील घटनेचा असला पाहिजे: आणि त्या निसर्गवर्णनातून मग त्याला इतर काहीही जाणवो, म्हणून अंजली कीर्तने यांनी म्हटलेले आहे, '' निसर्ग दृश्य याचा अत्यंत थोड्या शब्दात चित्ररुप द्यायचे त्याचे सामर्थ्य कायम राहिले तर हायकूचे स्वतंत्रपण टिकून राहिल. कारण, इतर छोट्या कविता, वात्रटिका असतील, विनोदी चुटके इ. असतील, लिमरिक असतील. परंतु हायकू हा तसा नसेल,.''[७] या साऱ्या विवेचनातून असे दिसून येते की, निसर्ग चित्रण हायच हायकूचा एकमेव विषय होय.

**घटनात्मकता -**

हायकूमध्ये निसर्गचित्रणाला महत्व आहे. हे खरे असले तरी केवळ निसर्गचित्रण म्हणजे हायकू नाही. तर त्या निसर्गचित्रणातून कोणत्यातरी प्रकाराची घटनाप्रतित होणे आवश्यक आहे. निसर्गातील वस्तूंचा रंग, रुप आकाराचे कितीही प्रत्ययकारी चित्रण केले तरी त्याचा हायकूत समावेश करता येणार नाही. हायकू म्हणजे केवळ निसर्गचित्रण नव्हे, तर निसर्गातील घटनेचे चित्रण होय. प्रत्येक हायकू म्हणजे निसर्गातील घडलेली एक घटना होय.

उदा. - गळून पडले फूल कॅमेलियाचे
तेव्हा कोंबडा आरवला
आणि दुसरे गळून पडले.

- वाईशित्सू (पृ. २३)

एकाकी रात्री काजवा
हातभर उंच उडी घेतो
आपला उजेड मालवून टाकतो

- हॉफुशी ( पृ. ६६)

स्तब्ध लेण्यात रात्र
पोकळी थड थड ते
दगडी शिल्प गात्र

- सुरेश मथुरे

(सत्यकथा एप्रिल १९८१) (पृ. ३८)

वातावरण शांत झालं अकस्मात
स्तब्ध झाली एकाएकी हवा
का कलकलतो कावळ्याचा थवा

(शिरिष पै - ध्रुवा - पृ. ३१)

सुकलेल्या वेलीचा
क्षणभर करुन करुण झुला
कावळा उडून गेला.

(शिरीष पै - हायकू पृ. २४)

या उदाहरणातून आपणास दिसून येईल की, वरील कवींनी हायकू लिहिताना निसर्गात घड लेल्या घट नेचे चित्रण केले आहे.

**नाट्यमयता -**

हायकूमध्ये निसर्गात घडलेल्या घटनेचे चित्रण असते. हे खरे असले तरी केवळ घटनेचेही चित्रण नसते. तर त्या घटनेतील नाट्यमयतेचे चित्रण असते. नाट्यमयता हा हायकू रचनेचा आणखी एक महत्वाचा घटक होय. या नाट्यमयतेमुळे हायकू वाचकांच्या मनाची पकड घेतो. रसिकांवर प्रभाव टाकतो. यामुळे हायकूमध्ये एक प्रकारची चित्ताकर्षकता निर्माण होते. ही नाट्यमयता बहुधा हायकूच्या तिसऱ्या ओळीत असते. पहिल्या दोन - १९ -ओळीमध्ये घटलेल्या एका घटनेचे चित्रण असते आणि तिसऱ्या ओळीत दुसऱ्या एका घटनेचे असे चित्रण केलेले असते की, दोन्ही चित्रणात एक प्रकारचा विरोध निर्माण होतो. असा नाट्यविरोध शोकनाट्यात आपणास आढळतो, त्याला Paradox असे म्हटले जाते. '' 'नाट्यमय कलाटणी ' हे तत्व असते. हायकूमध्ये नाट्यविरोध व नाट्यकलाटणी या दोन्ही तत्वांचा सुंदर अविष्कार आढळतो. उर्दू, शेर - शायरी, गझल या काव्यप्रकारांमध्ये याच तत्वांचा कलात्मक उपयोग केलेला असतो. कारण, उर्दूतील ते काव्यप्रकार केवळ वाचकांसाठी नसून समूहासाठी - रसिक श्रोत्यांसाठी असतो. हायकू हा काव्यप्रकार असा समूहातून निर्माण झाला आहे. हायकूचा प्रारंभ ज्या तांका आणि रेनकू या प्रकारातून झाला तो प्रकार समूहासमोर केलेल्या काव्यरचनेचा होता. शिरीष पै यांनी म्हटले आहे की, '' पहिल्या तीन ओळी एका कवीने रचावयाच्या तर पुढील दोन ओळी दुसऱ्या कवींनी रचायच्या. ' समस्यापूर्तीचाच ' एक प्रकार '' तसेच रेंगा हा काव्यप्रकार पुढे इतका लोकप्रिय होत गेला की, एका कवीच्या प्रश्नाला एकामागून एक अनेक कवी उत्तरे देऊ लागले आणि दोन दोन ओळींची उत्तरे वाढता वाढता रेंगा साखळीसारखा लांबत जाऊ लागला. ''८या विवेचनातून हे स्पष्ट होते की, उर्दू शेर - शायरी प्रमाणे हायकू हा मैफलीतून निर्माण झालेला काव्यप्रकार आहे.

**आत्मानुभवाशी संबंध -**

हायकू या काव्यप्रकारात वस्तुनिष्ठता व आत्मनिष्ठता यांचा सुरेख संगम साधलेला असतो. हा काव्य प्रकार पूर्णपणे वस्तुनिष्ठ आहे, नव्हे असला पाहिजे. या विषयी वाद होणयाचे कारण नाही. परंतु त्यातून व्यक्त होणारा, गर्भित होणारा अर्थ मात्र आत्मनिष्ठ स्वरुपाचा असला पाहिजे म्हणून शिरीष पै यांनी म्हटले आहे, ' दृश्य आणि कवी यांच्या परस्परसंबंधातून हायकू जन्माला येतो. निसर्ग आणि कवी ह्यांच्या ऐक्यामधून एक सार्वत्रिक भाव जाणवून देणे हेच हायकूचे यश, ''[१] याचा अर्थ कवीला त्याच्या आयुष्यात विविध प्रकारचे अनुभव आलेले असतात. त्या अनुभवाला पुरक अशी एखादी घटना तो निसर्गात पाहतो. आपल्या जीवनानुभवाची प्रचिती त्याला निसर्ग घटनेतून दिसते. त्यामुळे त्याचा चेतना जागृत होऊन तो काव्यचित्र रेखाटतो. या संदर्भात शिरीष पै यांनी केलेले विवेचन अर्थपूर्ण आहे, त्यांनी म्हटले आहे, '' अर्थात द्रष्टा वस्तूकडे बघतो तो या पूर्वसंचित अनुभूतीतून. त्या पूर्वसंचित अनुभूतीमुळेच वस्तुचे दर्शन घडताच त्याच्या चित्रातल्या संवेदना जाग्या होतात. समोरची वस्तू वा घटना त्याच्या पूर्वसूचित अनुभूतींना स्पर्श करण्याइतकी अर्थपूर्ण असेल, तरच ती त्याच्या कवितेचा विषय होऊ शकते. कवीने पूर्वीपासून आपले ' व्यक्तित्व ' शोधण्याचा प्रयत्न केला असेल आणि जीवनांत स्वत:तल्या खऱ्या ' व्यक्ती ' शी अद्वैत साधले असेल तसा तो हायकू लिहू शकेल. म्हणूनच हायकू लिहिणाऱ्या कवीची रोजचे जीवन जगत असतानाची प्रवृत्ती फार महत्वाची आहे. बाशोच्या मते कवीचे जीवन आणि त्याची कला ह्यांच्यात निर्दोष अशी सुसंगती साधली गेली पाहिजे. बाशोमधली पूर्ण, ' व्यक्ती ' ह्यामुळेच त्याच्या कवितेतून प्रकट होऊ शकली. कवीमधल्या पूर्ण ' व्यक्ती 'त्वाची अभिव्यक्ती हायकूतून होत असते. जीवनात स्वत:तल्या 'व्यक्ती' शी अद्वैत साधण्याचा, जगण्याचाच कला मानव्याचा कधीही न संपणारा प्रयत्न जो कवी करीत असतो, त्यालाच ही ' हायकू - वृत्ती ' साध्य होते.'' ह्याही पेक्षा त्यांनी दुसऱ्या एका ठिकाणी केलेले विवेचन महत्वाचे वाटते.

त्यांनी म्हटले आहे की, जपानी हायकूवर झेन तत्वज्ञानाचा फार मोठा प्रभाव आहे. त्या संदर्भात त्या म्हणतात, '' झेन तत्वात आताच्या क्षणाला अत्यंत महत्व आहे, ' आता ' आणि इथे ' हे दोन शब्द झेनपंथीय संपूर्ण अस्तित्वाचेच निदर्शक म्हणून वापरतात. व्यक्ती जिथे आहे तिथे आणि त्याच क्षणी पूर्ण जागृत होताच सर्वत्र भरुन राहिलेल्या परम चैतन्याचा स्त्रोत तिला जाणवतो. मात्र पूर्ण जागरुकता यायला हवी. वस्तू जशी आहे तशी त्याच स्रुपात पहावयाला, तिच्या अस्तित्वाचा वेध घेता यायला हवा. ह्याखेरीज, मनुष्य आणि निसर्ग ह्यांची पूर्ण एकरुपता हाही झेन तत्वातील दुसरा महत्वाचा विचार आहे. जीवनातील सगळ्या आकारात एक साधर्म्य आहे. सगळ्यांचे मूळ एकच आहे. त्याच्या त्या गूढ स्वरुपाचा साक्षात्कार जेव्हा कवीच्या संज्ञेला होतो तेव्हाच कवी हायकूतून तो साक्षात्कार आकाराला आणतो. मात्र हा साक्षात्कार हायकूतून प्रत्यक्षपणे वर्णन असा कोठेच केलेला नसतो. तो निश्चित काय आहे तेही उघड केलेले नसते. फक्त काही वस्तूंच्या उल्लेखातून तो सूचविलेला असतो. जणू तो त्या वस्तूंच्या आड लपलेला असतो. हायकू वरकरणी असतो एक, पण ध्वनित अर्थ वेगळाच असतो. वर दिसते ते दृश्य एक आणि त्यातून प्रगट होणारा, त्या दृश्यापलीकड अथांग पसरलेला जीवनमत.अर्थ दुसराच. ''[११] याचा अर्थ निसर्गातील दृश्य आणि कवीची पूर्वानुभूती यांच्या संयोगातून हायकू रचना तयार होते. निसर्गदृश्यातून कवीना आपल्याच जीवनातील एखाद्या अनुभवाचा साक्षात्कार होतो. त्यादृष्टीने खालील अनुवादित हायकू पाहण्यासारखे आहेत -

एक पान गळून पड तंय्
अरेरे ... अरेरे ... आणखी एक
गळून पड लेच आणखीन एक

- रॅनसेत्सु हायकू पृ. ३६

जीवनामध्ये कधी कधी दुर्दैवाचे असेक्षण येतात की, एक एक सुख, एक एक स्वप्न उध्वस्त होत जाते. त्याचे यात चित्रण आढळते.

एक तळं ... जुनाट ....
एक बेडूक बुडी घेतो त्यास
जराशी खळबळ ... पुन्हा शांत

- बाशो (हायकू पृ. ३७)

यांतील ' तळं ' म्हणजे जणू एक उदास, वृद्ध पण कधीतरी एखादा क्षण असा येतो की, तो क्षण यातील बेडकाप्रमाणे कांही नाद निर्माण करतो, तरंग निर्माण करतो, त्यामुळे वृद्धाच्या जीवनात कांही खळबळ निर्माण होते. पण क्षणभरच याचे सुरेख चित्रण आलेले आहे.

इतक्या वेगानं गाडी पुढं गेली
रस्त्यावर उमलेली रानफुलं
डोळे भरुन पाहताही नाही आली .

शिरीष पै (हायकू पृ. ७)

प्रवासातल्या एका निसर्गदृश्यातून शिरीष पै नी एका जीवनानुभवाला साकार केले आहे. कधी कधी आपल्या जीवनाला असा वेग येतो की, सुखाचा क्षण उपभोगताच येत नाही.

## चिंतनशीलता -

' हायकू ', या काव्यप्रकारात निसर्गाच्या चित्रणाला महत्व असले तरी, तितकेच महत्व त्यामध्ये जो अनुभव व्यक्त केलेला असतो, त्या अनुभवातून व्यक्त होणाऱ्या चिंतनालाही महत्व असते. अनुभवातून स्फुरलेले असे हे चिंतन नसेल तर, हायकू म्हणजे केवळ एक निसर्ग कविताच होईल. निसर्गाच्या घटनेतून हायकू - कवीला जीवनातील कोणत्यातरी सत्याचा साक्षात्कार झालेला असतो. अशा सत्याचा सूचक अविष्कार म्हणजे हायकू होय. मॅथ्यू ऑरनॉल्ड यांनी साहित्य म्हणजे ''जीवनभाष्य होय.'' असे जे म्हटले आहे त्याचा येथे प्रत्यय येतो. त्यामुळे हायकू मध्ये जे निसर्गाचे चित्रण केलेले असते, त्यातून कोणत्या तरी विचाराची अभिव्यक्ती झालेली असते. पण तो विचार हायकूला हलका फुलका नसून गंभीर असतो. या संदर्भात शिरीष पै यांनी म्हटले आहे की, ''निसर्गाच्या सान्निध्यात कवीला जी जागृती येते, सौंदर्याचे जे भान त्याच्या मनातून जागे होते, त्यातूनच त्याला जीवन सत्य जाणवते. निसर्ग आणि कवी ह्यांच्या परस्पर संबंधांचा उलगडा त्याला होतो. निसर्ग आणि कवी ह्यांच्या ऐक्यातून जन्म घेणारी ही अनुभूती म्हणजे एक सार्वलौकिक असे चिंतन सत्य असते. कवी आणि निसर्ग ह्या दोहोतून प्रवाहित होणारे संगीत जेंव्हा कवीला जाणवते तेंव्हा ह्या अनुभूतीनंतर कवीला प्राप्त होणारी अवस्था म्हणजे साक्षात ज्ञान उपलब्ध झाल्यावर येणारी निर्वाण अवस्थाच होय.'' याचा प्रत्यय पुढील हायकूतून दिसून येते.

फुलं खुडताना त्यानं
फांदी खसदिशी ओढली
चुकून कळीच तोडली

ध्रुवा - पृ. १९

उधळत गेला वारा

धुळीला, पाचोळ्याला

आणि फुलपाखराला

- शिरीष पै

(हायकूचे दिवस पृ. ३१)

अशा फुलपाखराला

काटेरी झुडपावर

जन्म मिळावा ?

- इस्सा

(हायकूचे दिवस पृ. ४१)

हाती येईल ती, ती फांदी

धरुन वहात वहात जायचं

मला नाही ........ नाही बुडायचं

- शिरीष पै

(हायकूचे दिवस पृ. ११)

या प्रत्येक हायकूत जीवनासंबंधीचाा विचार व्यक्त झालेला दिसून येतो. फुले खुडताना कळी का खुडली जावी? एखाद्या वादळवाऱ्यात धुळ, पाचोळा उडतो पण तो वारा फुलपाखरांनाही उधळून लावतो असे का व्हावे ? मानवी जीवनातील नियतीचा खेळ येथे दाखविला आहे. तर जगण्याची जिद्द मिळेल त्या फांदीला धरुन वाहात जाण्याच्या वर्णनात दिसून येते. अशा सूक्ष्म विचारामुळे हायकूतील निसर्गाचे चित्रे वाचकांच्या मनात अस्वस्थ प्रश्न निर्माण करतात. आणि जीवनासंबंधीचे कोणतेतरी सत्य प्रगट करतात.

# प्रकरण दुसरे

## संदर्भ - सूची


१) देशपांडे पु. ल. - प्रस्तावना, '' रंग माझा वेगळा '' - पृ. ८

२) पै शिरीष - ' हायकू ' प्रस्तावना - पृ. १३, १४

३) पै शिरीष - ' हायकू ' पृ. प्रस्तावना - पृ. ५,

४) पै शिरीष - ' हायकू ' पृ. प्रस्तावना - ६

५) पै शिरीष - ' हायकू ' पृ. १७

६) पै शिरीष - ' हायकू ' पृ. प्रस्तावना - ४

७) किर्तने अंजली - ' सत्यकथा ' ऑक्टो. १९८१ - पृ. ४१

८) पै शिरीष - प्रस्तावना - ध्रुवा पृ. ८

९) पै शिरीष - ' हायकू ' पृ. ९

१०) पै शिरीष - ' हायकू ' पृ.२०

११) पै शिरीष - प्रस्तावना - ध्रुवा पृ. ९, १०

१२) पै शिरीष - ' हायकू ' पृ.२९